Volume-2, Issue-1, Febuary 2019




# Anekant Journal of Humanities and Social Sciences

# विडंबन काव्याचा राजकारणानुबंध

प्रा. चंद्रशेखर भारती
मराठी विभाग
तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती
भ्रमणध्वनी - ७०२८९६१३८३

## अमुख :-

मराठीतील विडंबनगीत या काव्यप्रकाराचे मूळ इंग्रजी वाङ्मयात सटायर मध्ये आढळते. सटायर याचा अर्थ औपरोधिक काव्य. एखाद्या सुपरिचित अशा काव्याचे अनुकरण करून किंवा नक्कल करून उपहासाचा वळणाने लिहिलेले कोचदार काव्य म्हणजे विडंब काव्य होय. विनोद हा याचा मूलभूत पाय असतो तर समाजातील सर्वच क्षेत्रातील विकृतीचे दर्शन घडवून ती विकृती नष्ट करणे हे त्याचे ध्येय असते. लोकांचे रंजन करता करता डोळयात अंजन घालण्यची किमया विडंबन कलेत असते.

## मराठीतील विडंबन काव्याची परंपरा :-

माराठी माणूस हा जीवनाकडे गंभीर दृष्टीने पाहतो आणि त्याच्या सर्व कृत्यांच्या मुळाशी एक व्यावहारिक दृष्टी असते अशी एक विचारसरणी प्रचलित आहे. हा त्याचा स्वभाव मराठी वांङ्मयातही दृष्टीस पडतो. आणि म्हणूनच काही अपवाद वगळता मराठी भाषेच्या प्रांगणात ‘हास्य कविता ‘ हा प्रकार कोचीतच आढळतो. प्राचीन मराठी वांङ्मयातही ‘शिशुपालवध’, लीळा चरित्र’, ‘एकनाथांची भारुडे ‘ यात विनोदाच्या सहाय्याने तत्कालीन रिती रिवाजांचा उपहास केला आहे. तुकारानांनी आपल्या अभंगातून आणि पुढे शाहिरांनी आपल्या गणगौळण व सवाल जबाब मधून विडंबनाचा मोठा वापर केल्याचे जाणवते. पंडित कवींनीही विडंबनाचा आधार घेतला आहे. परंतु हमखास विडंबन काव्य म्हणून स्वतंत्रपणे उल्लेख करता येईल असे काव्य प्राचीन काव्यात किंवा शाहिरी काव्यात आढळून येत नाही. अव्व्ल इंग्रजी अंमलामध्ये मराठी वांङ्मयात नवनवीन प्रवाह आले त्यातूनच विडंबन काव्याचा प्रवाह मराठीत आला.

मराठीतील पहिले विडंबन काव्य म्हणून म.रा.तेलंग यांच्या ‘संगीत हजामत' ( १८८९ ) या पुस्तकच या उल्लेख केला जातो. त्यात किर्लोस्करांच्या शकुंतला व सौभद्र या नाटकातील पदांची विडंबने आहेत. त्यानंतर मु.ग.पाटील यांचे ‘कुलकर्णी लीलांमृत' (१९३१) व ‘ पांडवप्रतापच्या’ धर्तीवर लिहिलेले ‘शेटजी प्रताप ‘ हि दोन पुस्तके खूपच लोकप्रिय झाली. पण खऱ्या अर्थाने मराठीत विडंबन काव्य जन्माला आले ते १९२५ मधे. १९२५ मेधे मराठी साहित्यात अभूतपूर्व अशी खळबळ उडवून देणारी ‘झेंडूची फुल’ हा मराठी विडंबन काव्यातील फार मोठा व तितकाच महत्त्वाचा टप्पा मानलाच जातो. प्र.के. अत्रे यांबरोबरच पु.ल.देशपांडे यांनीही विडंबन क्षेत्रात मोलाची भर घातली आहे. ‘माझे पौष्टिक जिवन’, ‘कांही स्त्री गीते’, ‘आणखी एक रस’, ‘सहानुभाव वाङ्मय’, आंगुस्तान विद्यापीठ’, ‘पुढारी पाहिजे’, या आणि या सारख्या कलाकृतितून आपल्या नरम आणि विनोदप्रचुर शैलीतून, समाजातील विकृतीचे दर्शन घडविले आहे. अशी हि मराठीतील विडंबन काव्याची परंपरा या साऱ्या परंपरेत अढळ स्थानी असलेला ध्रुव तारा म्हणजे ‘झेंडूची फुले’ होय.

## **झेंडूच्या फुलेचे महत्त्व :-**

मराठीतील विडंबन काव्याला प्रतिष्ठा मिळवून देण्याचे महत्त्वाचे कार्य झेंडूच्या फुलाने केले आहे. काव्याच्या आणि पुढे राजकारणाच्या प्रांतातील नीतिमूल्यांची जे घसरण चालवू होती तिला पायबंद घालण्याच्या हेतूने अत्रेंनी हे काव्य लिहिले. आपल्या विनोदगर्भ उपहासाद्वारे अनेक ‘प्रतिष्ठीतांचे’ बुरखे फाडण्याचा त्यांचा हा प्रयत्न खूपच यशस्वी झाला. अत्रेंच्या झेंडूच्या फुलांना दोन प्रकारचे अर्थ १) वाङ्मय क्षेत्रातील अनिष्ट प्रथेचा समचार घेणारे विडंबन काव्य २) राजकीय क्षेत्रातील विडंबन काव्य. असे आहेत.

## **१) वाङ्मय क्षेत्रातील अनिष्ट प्रथेचा समचार घेणारे विडंबन काव्य:-**

१९२० च्या दरम्यान निरनिराळी सोंगे घेऊन मराठीतील कविमंडळी वांङ्मयाच्या क्षेत्रात धुमाकूळ घालीत होती. नावीन्याच्या नावाखाली कवितेत फारशी, उर्दू आणि गावठी मराठी शब्दांची बेंगरूळ भेसळ केली जात होती. केशवसुत, गोविंदाग्रजांचे अवमूल्यन चालू होते. हे सारं थांबविण्यासाठी अत्रेंनी अनेक विडंबन काव्ये लिहिली. ‘कविता आणि चोरं’ या काव्यात चोरापेक्षा कवीच चोर आहे हे त्यांनी दाखून दिले आहे. एकाच विषयावर अनेकांनी

ठरवून काव्यरचना करण्याच्या रविकिरण मंडळाच्या प्रयोगाची तर त्यांनी 'रस्त्यावर पडलेल्या विडीच्या थोटकार' या शीर्षकाची दोन सुनीते लिहून धमाल उडविली आहे. 'शामले' या कवितेत माधव ज्युलियन यांच्या कवितेतील चमत्कारिक विशेषांची टर उडविली आहे. तर कोणताही फालतू विषय घेऊन काव्य करणाऱ्या कवींचा समाचार त्यांनी 'काषायपेयपात्र पतित मिक्षिकेप्रत' या काव्यादवारे घेतला आहे.

'कवी आणि कारकून' या कवितेतून कारकुनापेक्षाही कवी हा नक्कल करण्यात कसा पटाईत आहे हे दाखविले आहे. 'पाखरा येशील का परतूनि' या काव्यावर 'परीटा येशील कधी परतुनी' हे विडंबन काव्य केले आहे.

थोडक्यात मराठी कवितेतील बांडगुळांचा त्यांना खरपूस असा समाचार झेंडूच्या फुलातून घ्यावयाचा आहे.

## <u>राजकीय क्षेत्राचा समाचार घेणारी विडंबन काव्ये :-</u>

_____महाराष्ट्रात संस्कृतीचा सच्चा रखवालदार म्हणून आचार्य अत्रेंचा उल्लेख केला जातो. त्यांनी आपली सारी ह्यात यासाठी घालविली. १९५० ते १९५६ च्या दरम्यान राजकारणातील अनिष्ट गोष्टींवर त्यांनी विडंबन काव्याचे शस्त्र उगारले. मोरारजी देसाई, यशवंतराव चव्हाण, स.का. पाटील, काकासाहेब गाडगीळ, पंडित नेहरू, अशा अनेक नेत्यांच्याच विसंगतीवर नेमकेपणाने बोट ठेवले आहे. प्रामुख्याने काँग्रेस पक्षातील पुढाऱ्यांनी त्याकाळी जी बेजबाबदार वक्तव्ये केली, स्वार्थासाठी वाट्टेल ती कृत्ये केली, त्यावर कडाडून हल्ला केला आहे. उदा. यशवंतराव चव्हाण आणि भाऊसाहेब हिरे यांच्याबाबतीत - ' मोरारजींच्या पायातले हे दोन मंत्री पायताण। मंत्री पदास्तव जाहले हे नेहरूंचे दोन श्वान ।' असे कडवट लेखन केले आहे. स्वार्थी पुढाऱ्यांचा समाचार घेताना ते म्हणतात -

'मना सज्जना चार आण्यात फक्त
तुला व्हावयाचे असे देशभक्त
तरी सांगतो शेवटी युक्ती सोपी
खिशामाजी ठेव सदा गांधी टोपी '

## <u>समारोप</u> :-

अशाप्रकारे विडंबन काव्याने त्या काळी  हास्य, विनोद, उपहास याद्वारे समाजातील वाईट प्रवृत्तीवर हला चढवला होता. साहित्याबरोबरच राजकारणातीलही वृतींवर त्या काळातील विडंबन काव्याने खरपूस समाचार घेतला आहे हे दिसून येते. व विडंबन काव्याचा राजकारणानुबंध उलघडून दाखविता येतो.

## <u>संदर्भ ग्रंथ सूची</u> :-

१. राजाध्यक्ष विजया संपा [1] 'मराठी समीक्षा संज्ञा संकल्पना कोश', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई, प्रथमावृत्ती: 2002

२. कोत्तापल्ले नागनाथ, 'साहित्याचा अन्वयार्थ ', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती: 1996

३. जाधव रा.ग. संपा [1] 'मराठी विश्वकोश', खंड[1] 3, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई

४. शी लक्ष्मणशास्त्री, 'मराठी विश्वकोश', खंड [1] 4, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ [1] मुंबई , 1976

५. जाधव रा.ग. साहित्य आणि सामाजिक संदर्भ, कॉंटिनेंटल प्रकाशन,पुणे, १९७५